# ‘श्रीराम फायनान्स’च्या ‘उन्नती’ला ‘एएए’ दर्जा

मुंबई : श्रीराम फायनान्स लि.च्या (एसएफएल) उन्नती मुदत ठेव योजनेला केअर रेटिंग्जने ‘एएए; स्टेबल’ दर्जा दिला आहे. यातून कंपनीची कर्जउभारणीची; तसेच परतफेडीची क्षमता मजबूत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याचबरोबर वेळेवर ठेवीदारांचा निधी परत करण्याच्या बाबतीत उच्च दर्जाची सुरक्षितता असल्याचेही स्पष्ट झाले आहे. कंपनीच्या कर्ज उभारणी पर्यायांबाबतही सकारात्मक दृष्टिकोन दर्शविला आहे.